<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३४७/२०२५</u>
<u>निशाणी क्र.१३.</u>

<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१ नेवासा, ता. नेवासा,</u>
<u>जि. अहमदनगर यांचे न्यायालयात.</u>
<u>गुन्हयाचा तपशिल</u>

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | - २६/०६/२०२४ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | - २७/०६/२०२४ |
| ३. | फिर्यादीचे नाव, राहण्याचे ठिकाण | - सोमनाथ गोपीनाथ शिंदे, वय- ५५ वर्षे, व्यवसाय- क्लीनर, रा.सुकेवाडी, ता. संगमनेर, जि.अहमदनगर. |
| ४. | आरोपीचे नाव, राहण्याचे ठिकाण | - संतोष बाबुराव भालेराव, वय- ५२ वर्षे, व्यवसाय- शेती रा. वडाळा महादेव, ता.श्रीरामपुर,जि.अहमदनगर. |

५. अ. ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशिल.

दिनांक २६.०६.२०२४ रोजी दुपारी १.३० वाजेच्या सुमारास सोनई ते घोडेगाव रोडवर तुम्ही तुमच्या ताब्यातील ट्रक क्र. एमएच १७ बी. डी. ८१८१ ही भरधाव वेगात चालवून मानवी जिवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तिला दुखापत अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम २७९ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही आरोपीने तुमच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून फिर्यादी व त्याचे ड्राव्हरला धडक देऊन त्यांना किरकोळ दुखापत पोचवली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३३७ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही आरोपीने तुमच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून फिर्यादी व त्याचा ड्राव्हर यांस धडक देऊन त्यांना जबर दुखापत पोचवली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३३८ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष

करुन तुमच्या ताब्यतील ट्रक क्र. एमएच १७ बी. डी. ८१८१ ही वेगाने किंवा धोकादायकपणे चालविले व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम १८४ प्रमाणे गुन्हा केलेला आहे.

वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही जखमींना वैद्यकीय मदत न देता तेथुन निघुन गेल्याने तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम १३४ **(अ)** सह १७७ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

वरील, तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही अपघातची खबर पोलीस स्टेशनला न देता तेथुन निघुन गेल्याने तुम्ही मोटार वाहन कायदयाचे कलम १३४ **(ब)** सह १७७ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला असा गुन्हा केलेला आहे.

आणि याद्वारे मी असे निर्देश देत आहे की, उपरोक्त आरोपाबाबत या न्यायालयाकडून तुमची न्यायचौकशी करणेत येत आहे.

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.07.16 16:45:35 +0530

दिनांक- १६.०७.२०२५.
नेवासा

(डॉ. पी. आर. सुगांवकर,)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
नेवासा